मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महापालिका आयोजित छत्रपती शिवाजी महाराज प्रबोधनपर्व 2025 चे उद्घाटन

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन : प्रबोधन पर्वाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते झाले

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महान कार्याचा आणि व्यापक विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी दरवर्षी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. शाहिरी, व्याख्यान, ३०० कलाकारांचे महानाट्य, कवितेतून समाज प्रबोधन अशा विविध कार्यक्रमांना शहरवासियांनी आणि विशेषत: युवा पिढीने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे आणि आदर्श राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन त्यांच्या विचारांचा वारसा जोपासावा असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२५ चे आयोजन निगडी येथील शक्ती-शक्ती चौक, अ प्रभाग जवळील नियोजित महापौर निवास मैदान, चिंचवड येथील छत्रपती संभाजीनगर,डांगे चौक,थेरगाव तसेच पिंपरी येथील एच. ए. कॉलनी या ठिकाणी १५ ते १९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत करण्यात आले आहे. या प्रबोधन पर्वाचे उद्घाटन काल निगडी येथील भक्ती शक्ती येथे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी नगरसदस्य सचिन चिखले, मारूती भापकर, उप आयुक्त अण्णा बोदडे, मुख्य आपत्ती व व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता राजेद्र शिंदे,नितिन देशमुख, बापूसाहेब गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,कनिष्ठ अभियंता चंद्रकांत कुंभार, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शाहिर अंबादास तावरे,भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव समितीचे जीवन बोराडे, नकुल भोईर, सागर तापकीर, बालाजी दानवले, दत्ताभाऊ देवतरासे, रोहिदास शिवनेकर, प्रकाश जाधव, धनाजी येळकर, वैभव जाधव, साईराज बोराडे, अनिकेत रसाळ, राजु पवार, सचिन अल्हाट, मिराताई कदम, सतिश काळे, अभिषेक म्हसे, प्रतिक इंगळे, निलेश शिंदे, वसंतराव पाटील,कुणाल कांबळे, संदिप निकम, गणेश सरकटे, संतोष जाधव, स्वप्निल शिंदे, मुख्य लिपीक किसन केंगले, लिपीक अभिजीत डोळस, माहिती व जनसंपर्क विभागातील तन्मय भोसले, चेतन मराडे, प्रफुल्ल कांबळे, ओंकार पवार, पियुष घसिंग तसेच महापालिका अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस मराठी वाहिनीवरील लोकप्रिय शाहीर रामानंद उगले यांनी “शाहिरीतून शिवदर्शन ” या कार्यक्रमादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज यांचे तेजस्वी विचार तसेच प्रेरणादायी जीवनावर आधारित पोवाड्यांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली, त्यांना वडील आप्पासाहेब उगले यांनीही साथ देत आपली शाहिरी सादर केली.

त्यानंतर प्रसिद्ध शिवव्याख्याते नितीन बानुगडे पाटील यांनी ‘‘असे होते छत्रपती शिवाजी महाराज” या विषयावर व्याख्यान सादर केले. यावेळी ते म्हणाले, सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात तुम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांची स्मारके त्यांनी केलेल्या तेजस्वी कार्यामुळे दि सतील. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावायचा नाही मग ते कोणत्याही प्रांतातील असो, स्त्रीयांचा सन्मान करा, परस्त्री मातेसमान असते अशी अनेक मुल्ये महाराजांनी पुढच्या पिढीला दिली. जगातील पहिला सर्जिकल स्ट्राईक महाराजांनी पुण्याच्या लाल महालात केला. त्यांनी त्यांच्या आयुष्यात बजावलेल्या कर्तव्याची बरोबरी कोणीच करू शकत नाही. प्रत्येकाला न्याय मिळेल असे स्वराज्य स्थापन करून प्रत्येकाच्या मनात स्वराज्याविषयी आपुलकी निर्माण करण्याचे का म त्यांनी केले. त्यांच्या तेजस्वी कार्यामुळे केवळ देशात नाही तर संपुर्ण जगात त्यांना सर्वोत्तम आदर्श राजे म्हणून ओळखले जाते. त्यांच्या या व्यापक कार्याचे, आणि इतिहासाचे पठण जर आजच्या पिढीने करायला हवे असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मारूती भापकर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी आणि आभार प्रदर्शन सचिन चिखले यांनी केले.

# पवना नदीवर मामुर्डी-सांगवडे दरम्यान पूल; 37 कोटी खर्चाचा अंदाज

## मामुर्डी आणि सांगवडे गावाला जोडण्यासाठी महापालिकेच्या वतीने पवना नदी पात्रावर पूल बांधण्यात येणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

मामुर्डी आणि सांगवडे गावाला जोडण्यासाठी महापालिकेच्या वतीने पवना नदी पात्रावर पूल बांधण्यात येणार आहे. त्यासाठी ३६ कोटी ६६ लाख रुपये खर्च येणार असून कामाची मुदत एक वर्ष आहे. वेळ व प्रवास खर्च अधिक होत आहे. सध्या असलेला लोखंडी पूल धोकादायक झाला आहे. ही गैरसोय टाळण्यासाठी नवीन पूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.



मामुर्डी आणि सांगवडे गावाला जोडण्यासाठी महापालिकेच्या वतीने पवना नदी पात्रावर पूल बांधण्यात येणार आहे. त्यासाठी ३६ कोटी ६६ लाख रुपये खर्च येणार असून कामाची मुदत एक वर्ष आहे.

शहराच्या सीमेवर असलेल्या मामुर्डी व किवळे भागातून हिंजवडी माहिती व तंत्रज्ञाननगरीकडे जाण्यासाठी जवळचा पूल नसल्याने नागरिकांना वळसा मारून ये-जा करावी लागत आहे. त्यामुळे वेळ व प्रवास खर्च अधिक होत आहे. सध्या असलेला लोखंडी पूल धोकादायक झाला आहे. ही गैरसोय टाळण्यासाठी नवीन पूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

महापालिकेच्या स्थापत्य मुख्यालयाच्या वतीने पुलाच्या कामासाठी ३७ कोटी २५ लाख ९१ हजार ३६६ रुपये खर्चाची निविदा प्रसिद्ध केली होती. त्यासाठी चार ठेकेदारांच्या निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी ए. आर. कन्स्ट्रक्शन व टी ॲण्ड टी इन्फा लिमिटेडची ३६ कोटी ६६ लाख रुपये खर्चाची कमी दराची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. बारा महिन्यांत पुलाचे काम पूर्ण केले जाणार आहे. या पुलामुळे मामुर्डी व सांगवडे तसेच, हिंजवडीकडे ये-जा करणे सुलभ होणार आहे. सर्व प्रकाराच्या वाहनांना पुलावरून ये-जा करता येणार आहे.

दरम्यान, पिंपरी व पिंपळे सौदागर या गावांना जोडणाऱ्या पवना नदीवरील समांतर पुलाचे काम अतिशय संथगतीने सुरू आहे. थेरगाव येथे पवना नदीवर फुलपाखरू प्रकारातील आणि स्टील गर्डरमधील पुलाच्या उभारणीचे काम पूर्ण झाले आहे. पुलाला जोडणाऱ्या जोडरस्त्याचे काम अपूर्ण असल्याने हा पूल अद्याप सुरू होऊ शकलेला नाही.

# पुणे महापालिकेचे अंदाजपत्रक मार्चच्या पहिल्या आठवड्यात होणार सादर

## नेत्यांकडून सुचविलेल्या कामांना निधी देण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्यावर दबावतंत्र वापरले जात असल्याची चर्चा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेचा २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सादर केले जाणार आहे. अंदाजपत्रक तयार करण्यासाठी प्रशासनाच्या बैठकांचा जोर चांगलाच वाढला आहे. हे अंदाजपत्रक तयार होत असताना राज्यात सत्तेत असलेल्या पक्षांच्या नेत्यांकडून सुचविलेल्या कामांना निधी देण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्यावर दबावतंत्र वापरले जात असल्याची चर्चा महापालिकेत मोठ्या प्रमाणावर रंगली आहे.

पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी अभ्यास करून अंदाजपत्रक तयार करण्यासाठी विधानभवनातील 'व्हीआयपी' कार्यालय गाठल्याची माहिती समोर आली होती. त्यावरून महापालिकेतील अधिकाऱ्यांनी आश्चर्य व्यक्त केले होते. दुसरीकडे, शहरातील राजकीय पुढाऱ्यांच्या मागणीनुसार विकास कामांसाठी निधी देण्यासाठी जोर लावला जात आहे. शहरातील आमदार आणि वजनदार माजी नगरसेवकांनी शेकडो कोटी रुपयांचा निधी मागणी केली आहे. शहरातील प्रमुख दहा-पंधरा नेत्यांसाठीच सुमारे दोन हजार कोटींची तरतूद केली जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. तसेच आयुक्तांना राजकीय पुढाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या आणि त्याप्रमाणे तरतुदी केल्या तर हा नवा पायंडा पाडला जाईल, अशी भीती आहे. आगामी काळात महापालिकेची निवडणूक झाल्यानंतर नगरसेवक येतील. पुढच्या वर्षी अंदाजपत्रकातील निधी देण्यावरून आमदार आणि नगरसेवक यांच्यात वाद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आयुक्तांनी असा पायंडा पाडू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




### अधिकारीच सांगतात, आमदारांकडून पत्र घ्या

» शहरात महायुतीचे पाच तर विरोधी पक्षाचा एक आमदार आहे. गेल्या महिन्यात विद्यमान आमदारांनी महापालिकेत ठाण मांडून विविध विकामकामे रखडल्यावरून महापालिकेची झाडाझडती घेतली होती. त्यातून प्रशासनावर वचक निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता. आता याचाच आधार घेत शहरातील विविध विकासकामे करवून घेण्यासाठी आमदार पत्र देत आहेत. याचा फायदा घेत माजी नगरसेवकांकडूनही पत्र दिले जात आहे. परंतु 'माजी' असल्याने त्यांचे वजन कमी पडते. वजन वाढवायचे असेल विद्यमान आमदारांचे पत्र घ्या अन् सुचवलेल्या कामांसाठी निधी पदरात पाडून घ्या, असा सल्ला महापालिकेतील काही अधिकाऱ्यांकडून दिला जात आहे, तर काही माजी नगरसेवक त्यांचे स्वतःचे वजन वापरून १० कोटीपासून ३०-४० कोटी रुपयांपर्यंतच्या कामाची तरतूद मागत आहेत.

### अनेक माजी नगरसेवकांनी सुचविली विविध कामे

» आगामी काळात महापालिकेची निवडणूक होणार आहे. शहरात अनेक भागात पायाभूत सुविधा मिळत नसल्याने नागरिक त्रासले आहेत. नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. प्रभागात कामे केली तर निवडणूक प्रचारात हे मुद्दे मांडता येतील. तसेच विकासकामे केल्याने नागरिकांना दिलासाही मिळेल. यामुळे शहरातील अनेक माजी नगरसेवकांनी प्रशासनाला पत्र दिले आहे. शहरातील आमदारांनी त्यांच्या मतदारसंघात सुमारे ४०० ते ५०० कोटी रुपयांची कामे सुचवल्याची चर्चा प्रशासनातील अधिकाऱ्यांमध्ये सुरू आहे. अर्थसंकल्पातील तरतुदी अंतिम करत असताना राज्यात सत्तेत असलेल्या महायुतीमधील घटक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना झुकते माप दिले जात आहे. यामध्ये नवीन रस्ता करणे, डांबरीकरण करणे, सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता करणे, सांडपाणी वाहिनी टाकणे, सांडपाणी वाहिनी बदलणे, पथ दिवे लावणे, विद्युत वाहिनी भूमिगत करणे, गटार टाकणे, उद्यानाची देखभाल दुरुस्ती करणे, उद्यानात खेळणी बसविणे, सीसीटीव्ही बसविणे अशा कामांचा समावेश आहे.

> अंदाजपत्रक तयार करताना कोणाचाही दबाव नाही. अंदाजपत्रक तयार केले जात असताना अनेक राजकीय नेत्यांसह पदाधिकाऱ्यांचे पत्र येत आहे. त्यांनी दिलेल्या पत्राचाही विचार केला जाईल. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अर्थसंकल्प सादर केला जाईल.
>
> **- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका**

# जीबीएसची लागण पाण्यामुळं नाही तर कोंबड्यांमुळं; अजितदादांनी दिली महत्त्वाची माहिती

## जीबीएस आजार हा पाण्यामुळे होत असल्याचा दावा याआधी केला जात होता, पण या आजाराचं संक्रमण होण्यामागील आणखी एक कारण आता समोर आलं आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जीबीएस आजार हा पाण्यामुळे होत असल्याचा दावा याआधी केला जात होता. त्यापार्श्वभूमीवर नागरिक मोठी खबरदारीसुद्धा घेत होते. पण या आजाराचं संक्रमण होण्यामागील आणखी एक कारण आता समोर आलं आहे.

पुण्यापाठोपाठ राज्याच्या इतर शहरात गुलेन बॅरी सिंड्रोम म्हणजेच जीबीएसने आपले हातपाय पसरायला सुरुवात केली आहे. या आजाराच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळं राज्यात कोरोनानंतर नवं संकट येणार याची भीती नागिकांच्या मनात आहे. या आजाराची लागण होण्याच मुळ कारण दुषित पाणी असल्याचा दावा आरोग्यतज्ज्ञांनी केला आहे. पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दावा फेटाळत जीबीएसची लागण पाण्यामुळं नाही तर कोंबड्यांमुळं होत असल्याचे म्हटलं आहे.

जीबीएस आजार हा पाण्यामुळे होत असल्याचा दावा याआधी केला जात होता. त्यापार्श्वभूमीवर नागरिक मोठी खबरदारीसुद्धा घेत होते. पण या आजाराचं संक्रमण होण्यामागील आणखी एक कारण आता समोर आलं आहे.

फक्त दुषित पाण्यामुळेच नाही तर कोंबड्यांमुळे या आजाराची लागण होत असल्याची माहिती उमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. दरम्यान ज्या भागात हा आजार पसरला तिथल्या कोंबड्यांची व्हिल्हेवाट लावायची गरज नाही. फक्त कोंबड्या घेतल्यानंतर ते अन्न पूर्णपणे शिजवून घेतलं पाहिजे अशी महितीदेखील त्यांनी यावेळी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात आत्तापर्यंत 124 जीबीएस बाधितांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. तर बाधित रुग्णसंख्या 208 वर पोहोचली असून त्यातील 181 रूग्णांना जीबीएसचं निदान झालंय. पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातही रुग्ण आढळत आहेत.




### नेमकं काय म्हणाले अजितदादा?

» पाण्यामुळं या आजाराची लागण झाली असं आपल्याला वाटतं पण तसं नाही. खडकवासला परिसरातील काहींचं म्हणणं आहे की, कोंबड्यांमुळे या आजाराची लागण झाली. त्याबाबत अतिशय चांगल्या प्रकारची सगळी माहिती घेतलेली आहे. मी आता राजेंद्र भोसले यांना प्रेसनोट काढायला सांगणार आहे. तिथल्या कोंबड्यांची व्हिल्हेवाट लावायची गरज नाही. फक्त कोंबड्या घेतल्यानंतर ते अन्न पूर्णपणे शिजवून घेतलं पाहिजे, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

# पिंपरी चिंचवड शहरात प्रदूषण करणाऱ्यांवर आता महापालिकेची करडी नजर

## दोन खाजगी संस्थेची केली नेमणूक, पर्यावरणाची हानी करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहराच्या सौदर्य व नागरिकांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी सदैव तत्पर असते. त्यासाठी महापालिका वेगवेगळे उपक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग म्हणून आता शहरात सार्वजनिक ठिकाणी कचरा, राडा-रोडा, प्लास्टिक, शहरात आरएमसी प्लॉटमधून होणारे हवेचे प्रदूषण, बांधकामाच्या ठिकाणी होणारा कर्कश आवाज, शहरात होणारे ध्वनी प्रदूषण, घर बांधकाम करतांना घराच्या बाहेर टाकला जाणारा राडारोडा तसेच सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करणाऱ्यांवर महापालिका २४X७ करडी नजर ठेवणार आहे.

त्यासाठी महानगरपालिकेने मे शुभम उद्योग प्रा. लि. व मे. सैनिक इंटलिजन्स अँड सिक्युरिटी प्रा. लि. या संस्थेची स्वतंत्रपणे नेमणूक केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात पर्यावरणाची हानी करणाऱ्या कंपन्या किंवा समाजकंटकांवर महापालिका या संस्थेमार्फत लक्ष ठेवणार असून पर्यावरणाची हानी करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.



पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिका हद्दीमध्ये स्थानिक नागरिक किंवा अज्ञात नागरिक रस्त्यांच्या कडेला नदी नाले यांच्या कडेला अनधिकृत भराव व बांधकाम राडा-रोडा टाकतात. सार्वजनिक ठिकाणी घनकचरा टाकणे परिसर अस्वच्छ ठेवणे, रस्ते पदपथावर घाण-कचरा करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, लघुशंका करणे, सार्वजनिक सभा संपल्यानंतर साफसफाई न करणे, जीव वैद्यकीय घनकचरा सार्वजनिक ठिकाणी फेकणे, कचरा जाळणे, बंदी असलेल्या प्लास्टिकचा उपयोग करणे, मोकळ्या जागेवर अस्वच्छता ठेवणे, डास उत्पन्न करणाऱ्या जागा निर्माण करणे, तसेच लहान उद्योजक कारखानदार सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नाल्यात किंवा नदी पात्रात सोडतात.

या सर्व कारणांमुळे महानगरपालिका परिसरात अस्वच्छता पसरते. परिणामी पर्यवरण हानी होते. नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या पुढाकारतून पर्यावरण हानी रोखण्यासाठी मे. शुभम उद्योग प्रा. लि. व मे. सैनिक इंटलिजन्स अँड सिक्युरिटी प्रा.लि. या संस्थेची नेमणूक केली आहे.

सदर संस्थेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील बांधकाम व्यवस्थापन २०१६, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम २०१६, बांधकाम राडा रोडा मार्गदर्शन तत्वे, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन मार्गदर्शन तत्वे, ई- कचरा व्यवस्थापन नियम २०२२, प्लास्टिक व्यवस्थापन नियम २०२२ इत्यादी नियम व अधिनियमानुसार वरील दोन्ही पथकांमार्फत २४X७ कारवाई करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिका हद्दीतील नागरिक, कारखानदार, दुकानदार, तसेच सर्व प्रकारच्या व्यावसायिकांना सूचित करण्यात येते की पिंपरी चिंचवड शहरात कोणत्याही प्रकारे पर्यावरणास हानिकारक कृती करत असाल तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार सदर नागरिक, कारखानदार, बिल्डर यांच्यावर कारवाई करण्यात येणार असून नियमांचे उल्लघन केल्यास दंडात्मक कारवाई देखील करण्यात येणार आहे.

> पिंपरी चिंचवड शहरात महानगरपालिकेचे सहा हजाराहून अधिक सफाई कर्मचारी दररोज स्वच्छता करत असतात. परंतु शहराचे हे सौदर्य अबाधित राखण्यासाठी फक्त सफाई करून उपयोग नाही तर त्यासाठी नागरिकांचा सहभाग देखील गरजेचा आहे.
> **- शेखर सिंह आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी आपली सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे आपल्या घरातील कचरा इतरत्र न टाकता योग्य ठिकाणी टाकणे आवश्यक आहे. तसेच औद्योगिक कंपन्यांनी देखील केमिकल मिश्रीत पाणी प्रक्रिया करून नदीत सोडणे आवश्यक आहे. हे जर आपण साध्य झाले तर आपल्या शहराचे आरोग्य अबाधित ठेवू शकतो.
> **- संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पर्यावरण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# गुंठेवारीस 30 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ, पीएमआरडीएतील बांधकाम नियमितीकरण अत्यल्प; नागरिकांचा थंड प्रतिसाद

## गुंठेवारीसाठी ऑक्टोबर 2024 मध्ये नव्याने अर्ज मागविल्यानंतर एकूणात केवळ 58 अर्ज आले. त्यापैकी केवळ 6 बांधकामे नियमित झाली आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) गुंठेवारी कायद्यांतर्गत बांधकामे अधिकृत करून घेण्यासाठीच्या कामांना नागरिकांकडून थंड प्रतिसाद मिळत आहे. गुंठेवारीसाठी ऑक्टोबर 2024 मध्ये नव्याने अर्ज मागविल्यानंतर एकूणात केवळ 58 अर्ज आले. त्यापैकी केवळ 6 बांधकामे नियमित झाली आहेत.

दरम्यान, पीएमआरडीए प्रशासनाने गुंठेवारीअंतर्गत बांधकामे नियमित करण्यासाठी 30 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. आधी ही मुदत 31 मार्चपर्यंत होती. गुंठेवारी कायद्यामध्ये योग्य त्या सुधारणा करून 31 डिसेंबर2020 पूर्वीचे गुंठेवारी पद्धतीने विकसित झालेले अनधिकृत भूखंड/ बांधकामे नियमित करण्याची संधी राज्य शासनाने नागरिकांना उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार, अनधिकृतरित्या विकसित झालेल्या गुंठेवारी स्वरुपातील भूखंड/बांधकामांचे नियमितीकरण करण्याचे धोरण पीएमआरडीएने अवलंबले आहे. त्यासाठी 11 ऑक्टोबर 2024 रोजी प्रकटन प्रसिद्ध केले होते, अशी माहिती पीएमआरडीएच्या विकास परवानगी विभागातील प्रशासकीय सूत्रांनी दिली.

पीएमआरडीएकडून आकारल्या जाणाऱ्या प्रशमन शुल्कामध्ये 50 टक्के सवलत देण्यात आलेली आहे. 31 मार्चपर्यंत मंजूर होणाऱ्या प्रकरणांनाच ही सवलत मिळणार आहे. 11 ऑक्टोबर 2024 पासून आत्तापर्यंत 58 अर्ज पीएमआरडीए प्रशासनाला प्राप्त झाले आहेत. त्यातील 6 अर्ज मंजूर झाले आहेत. अन्य अर्जांपैकी काही अर्ज अमान्य झाले आहेत. तर, काही अर्जांबाबत विविध कागदपत्रांची पूर्तता करण्यास अर्जदारांना सांगण्यात आले आहे.

### ॲम्नेस्टी योजनेतील सवलत 31 मार्चपर्यंत

» गुंठेवारीअंतर्गत बांधकामे नियमित करण्यासाठी सध्या पीएमआरडीएतर्फे ॲम्नेस्टी योजना लागू आहे. त्यानुसार, पीएमआरडीएकडून आकारल्या जाणाऱ्या प्रशमन शुल्कामध्ये 50 टक्के सवलत देण्यात आलेली आहे. 31 मार्चपर्यंत मंजूर होणाऱ्या प्रकरणांनाच ही सवलत मिळणार आहे.

### 61 किमी लांबीचे रस्ते जोडणार

» गुंठेवारीअंतर्गत ॲम्नेस्टी योजना लागू केल्यापासून म्हणजेच 11 ऑक्टोबर 2024 पासून आत्तापर्यंत 58 अर्ज पीएमआरडीए प्रशासनाला प्राप्त झाले आहेत. त्यातील 6 अर्ज मंजूर झाले आहेत. अन्य अर्जांपैकी काही अर्ज अमान्य झाले आहेत. तर, काही अर्जांबाबत विविध कागदपत्रांची पूर्तता करण्यास अर्जदारांना सांगण्यात आले आहे.

# पुरंदरमधूनच 'टेक ऑफ'; विमानतळाच्या कनेक्टीव्हिटीसाठी पीएमएआरडीएचा विकास आराखडा

## आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला गती देण्यासाठी राज्य सरकारकडून मेट्रो, रेल्वे, जोड रस्त्यांच्या 'कनेटिव्हिटीला' प्राधान्य देण्यात आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदरमधील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, पारगाव आदी सात गावांमधील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला गती देण्यासाठी राज्य सरकारकडून मेट्रो, रेल्वे, जोड रस्त्यांच्या 'कनेटिव्हिटीला' प्राधान्य देण्यात आले आहे. त्याअंतर्गत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) अर्थसंकल्प आणि मेट्रोच्या एकात्मिक वाहतूक आराखड्यात अनेक पर्यायी मार्गांची आखणी केली आहे. त्यामुळे प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंतचा भविष्यातील प्रवास सुकर होण्याच्या दृष्टीने जोरदार बांधणी सुरू असल्याचे दिसत आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या एकूण 2 हजार 550 चौरस किलोमीटर क्षेत्रासाठीचा एकात्मिक वाहतूक आराखडा नुकताच करण्यात आला आहे. त्यासाठी 1 लाख 26 हजार कोटींचा खर्च अपेक्षित असून या एकात्मिक आराखड्यात पुरंदर विमानतळापर्यंतचा 'कनेक्ट' वाढविण्यासाठी मेट्रो मार्गिका, पीएमपीचे नवे मार्ग, टर्मिनल, रेल्वे जोड मार्गिका प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पातही पुरंदर विमान तळापर्यंतची कनेक्टव्हिटी वाढविण्यासाठी जोड रस्ते, काँक्रीट रस्ते, राष्ट्रीय आणि राज्य महामार्गाला जोडणारे रस्ते, बाह्यवळण वर्तुळाकार मार्गाला जोडणारे रस्ते प्रस्तावित करण्यात आले आहेत.

तब्बल 636 कोटीं खर्च येत्या काही वर्षांत पीएमआरडीएकडून यासाठी करण्यात येणार आहे. एकात्मिक वाहतूक आराखड्यानुसार पुरंदर विमानतळाची प्रवासी वाहतूक क्षमता वार्षिक 8.1 लाख इतकी असून 39 हजार 369 टन एवढ्या कार्गोची वाहतूक होणार आहे. सध्या प्रस्तावित विमानतळाकडे दोन मार्ग आहेत. त्यामुळे नव्याने काही मार्गात सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. त्यानुसार पाच रस्त्यांमध्ये सुधारणा करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.



### 'पीएमपी'चेही जाळे निर्माण करण्यात येणार

» सासवड येथील पीएमपीच्या टर्मिनलचाही पुनर्विकास करण्यात येणार आहे. तसेच सात इंटर बस टर्मिलनही सासवड येथे निर्माण करण्यात येणार आहे. एकात्मिक वाहतूक आराखड्यानुसार तळेगाव, दौंड स्थानकांना बाह्यवळण रेल्वे मार्गाने जोडण्याचेही नियोजित आहे. त्यासाठी दोन टप्प्यांत ही कामे केली जातील. तळेगाव ते शिक्रापूर या दरम्यान उरुळी कांचनपर्यंत पूरक सेवा (फीडर सर्व्हिस) देणे नियोजित आहे. तर दुसऱ्या टप्प्यात शिक्रापूर ते दौंड हा रेल्वे मार्ग प्रस्तावित आहे.

### 61 किमी लांबीचे रस्ते जोडणार

» पुरंदरमधील प्रस्तावित विमानतळ परिसरात रस्त्यांचे जाळेही पीएमएआरडीएकडून विस्तारित करण्यात येणार आहे. त्यासाठी 636 कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यांतर्गत सिमेंट कॉन्क्रेटचे रस्ते राष्ट्रीय आणि राज्य महामार्गाला जोडणारे रस्ते, बाह्य वर्तुळाकार मार्गाला जोडणारे रस्ते तयार करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. एकूण 61 किमी लांबीचे रस्ते या माध्यमातून जोडण्यात येणार आहेत.

### रेल्वेचा स्वतंत्र मार्ग?

» सातारा रेल्वे मार्गावर प्रस्तावित विमानतळाजवळ जेजुरी आणि राजेवाडी ही दोन रेल्वे स्थानके आहेत. त्यातील राजेवाडी हे स्थानक विमानतळापासून जवळ आहे. त्यामुळे राजेवाडी ते विमानतळ या दरम्यान रेल्वेचा स्वतंत्र मार्ग (स्पूर लाइन) विकसित करावा लागेल, असे या आराखड्यात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विमानतळाकडे जाणाऱ्या प्रवाशांना जाणे-येणे सुलभ होईल, असा दावाही करण्यात आला आहे.पुणे-लोणावळा रेल्वे मार्गाचे विस्तारीकरण झाल्यानंतर बाह्य वळण मार्गाचाही वाहतुकीच्या दृष्टीने योग्य वापर करता येईल, असे या आराखड्यात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच पुणे-मिरज मार्गावरील फुरसुंगी स्थानकाचे पॅसेंजर टर्मिनलमध्ये रूपांतर करून ते शिंदवणे येथे स्थलांतरित करावे, असा प्रस्ताव आराखड्यात ठेवण्यात आला आहे.

# पूर्व हवेलीत फेब्रुवारीमध्येच पाणीटंचाई, कालवा समितीची बैठक रखडल्याने पूर्व हवेलीतील अनेक गावात दुष्काळी परिस्थिती

## एकेकाळी सुजलाम सुफलाम असणारा हवेली तालुका आता पाण्याअभावी दुष्काळी वाटू लागला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

या वर्षी पुर्व हवेलीत फेब्रुवारीमध्येच दुष्काळी स्थिती जाणवू लागली असून पाणीटंचाई तीव्र झाली आहे. एकेकाळी सुजलाम सुफलाम असणारा हवेली तालुका आता पाण्याअभावी दुष्काळी वाटू लागला आहे.

पूर्व हवेलीला वरदान ठरलेला नवीन मुळा मुठा कालवा आता बंद केल्याने येणाऱ्या काळात तीव्र पिण्याच्या व शेतीच्या पाण्याची टंचाई जाणवणार आहे. पूर्व हवेलीतील कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, कुंजीरवाडी, मांजरी, शेवाळेवाडी, म्हातोबाची आळंदी, वळती, तरडे, सोरतापवाडी, नायगाव, पेठ, उरुळी कांचन इत्यादी ठिकाणी शेतीच्या पाण्याची बिकट परिस्थिती असून शेकडो एकर शेती पाण्याअभावी पडुन आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत आहे. त्यातच ज्या शेतकऱ्यांकडे शेतीसाठी थोडे पाणी आहे. ते शेतीला देताना वीजेचा अडथळा येत आहे. सतत होणाऱ्या विजेच्या लपंडावामुळे विहिरीत पाणी आणि शेती कोरडी अशी अवस्था झाली आहे.

नवीन मुळा मोठा कालवा आता बंद केल्यामुळे परिस्थिती आणखीनच बिकट झाली आहे. वरील गावे ही संपूर्ण कालव्यावर अवलंबून असुन कालवा बंद केल्यामुळे विहिरी व बोअर आटले आहेत. तसेच पूर्व हवेलीतील अनेक गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई सुद्धा निर्माण झाली आहे. तर काही गावात टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. त्यामुळे शेतकरी आता कालव्यात पाणी कधी येते याच्या प्रतिक्षेत आहेत. हवेली तालुका हा महानगरपालिकेच्या जवळ असल्याने येथील जमिनीनां सोन्याचा बाजार आहे.

त्यामुळे ओढे, नाले बुजवून त्यावर अतिक्रमणे मोठ्या प्रमाणावर झाली आहेत. त्यातच बऱ्याच ठिकाणी जुने ओढयांवर मोठ्या नळ्या टाकून ओढे बुजून टाकले आहेत. त्यामुळे जमिनीत पाणी मुरणे बंद झाले असून, विहीरीनां व बोअरला पाणीच शिल्लक राहिले नाही. त्यामुळे लवकरात लवकर कालव्यात पाणी सोडावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



"कालवा सल्लागार समितीच्या बैठक अद्याप झाली नाही. लवकरच ही बैठक होऊन त्यामध्ये पुढील आवर्तन कधी सोडणार हे कळेल. त्याप्रमाणे आवर्तन सोडले जाईल.
- श्वेता कुऱ्हाडे, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग खडकवासला

"अनेक वर्षानंतर प्रथमच फेब्रुवारी महिन्यात इतक्या प्रचंड प्रमाणात दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली असून विहीर, बोरवेल व इतर पाण्याचे सोर्स बंद झाले आहेत. शेतकऱ्यांची पिके जळून जायला लागली आहेत. पाण्याअभावी काही शेतकऱ्यांनी ऊस जळण्यापेक्षा कुट्टीला दिलेला आहे. तसेच नर्सरी उद्योगावर सुद्धा पाण्याच्या टंचाईची झळ बसत आहे. त्यामुळे आता हजारो एकर जमीन कालवा बंद असल्यामुळे पडून आहे.
- भाऊसाहेब चौधरी, शेतकरी सोरतापवाडी